जिल्हा व सत्र न्यायालय, जालना

निविदा / दरपत्रक

जिल्हा व सत्र न्यायालय, जालना यांचेकरिता दिवाणी न्यायालय क.स्तर, परतुर येथुन जिल्हा न्यायालय, जालना येथे खालील प्रमाणे दोन जनरेटर सुस्थितीत पोहचते करण्यासाठीचे वाहतुकीबाबतची निविदा/दरपत्रक मागवित आहे.

अ. क्र.	विवरण	सिरीयल क्रमांक	परतुर येथील जडवस्तु संग्रह क्रमांक
1	Kirloskar 5KVA Disel Generator	D31610/1400171	CJJD/PTR/Ecourts/14/1
2	Perfect Portable silent Genset	DG Sr No. PKD-0394 Engine No. 4816200276	CJJD/PTR/Ecourts/14/2

उपरोक्त वाहतुकीचे सदरील वाहतुकदाराने आपले दरपत्रक सोबत दिलेल्या "नियम व अटींच्या" अधिन राहून या कार्यालयाच्या खालील पत्त्यावर सीलबंद पाकिटावर **प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जालना** यांचे नावे दिनांक 10.10.2025 रोजी सायंकाळी 05:30 वाजेपर्यंत मिळतील, अशा बेताने पाठविण्याची व्यवस्था करावी. यानंतर प्राप्त झालेले दरपत्रक (निविदा) ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

आदेशान्वये,

25/9/25

प्रबंधक,

जिल्हा व सत्र न्यायालय, जालना

दिनांक 25.09.2025

जिल्हा व सत्र न्यायालय, जालना

दिवाणी न्यायालय क.स्तर, परतुर येथुन जिल्हा व सत्र न्यायालय, जालना येथे दोन जनरेटर वाहतूकीचे दरपत्रकासाठी खालीलप्रमाणे नियम, शर्ती व अटी लागू राहतील.

01) प्रत्येक निविदाकारास फक्त एकच दरपत्रक दाखल करण्याची परवानगी असेल, याची नोंद घ्यावी. सदरील दरपत्रक दिवाणी न्यायाल क.स्तर, परतूर येथील दोन जनरेटर सेट हे जिल्हा न्यायालय, जालना येथे सुस्थीतीत पोहचते करुन देण्यासाठीचे वाहतूकीचे दर राहतील. निविदाकारास दोन्ही जनरेटर सेट हे दिवाणी न्यायालय क.स्तर, परतूर येथे पहावयास मिळतील.

02) निविदाकाराने दिवाणी न्यायालय क.स्तर, परतूर व जिल्हा न्यायालय, जालना येथील दोन्ही ठिकाणांची प्रत्यक्षात पाहणी करावी व दोन्ही कार्यालयाचे भेट दिल्याबाबतचे प्रमाणपत्र निविदे सोबत दाखल करावे. जेणे करुन आपल्याला दोन्ही कार्यालयाचे अंतर वाहतूकीची गणना करण्यास उपयोगी ठरेल.

03) या कार्यालयाचे गरजांची पूर्तता करण्यात येणारे व सर्वात कमी किंमतीचे दरपत्रक मंजुर करण्यात येतील.

04) निविदाकाराला अधिकृत पुरवठादार/एजन्सी लेटर हेडवर दरपत्रक सादर करणे व त्यावर जीएसटी क्रमांक नमुद करणे बंधनकारक राहील.

05) दरपत्रकामध्ये सर्व प्रकारच्या करांसह, इतर चार्जस् वगैरे यांचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.

06) दरपत्रक सादर करणाऱ्या विशेष वाहतूकदाराचा खरेदी कार्यालयाबरोबर कोणताही हितसंबंध नसावा, याची नोंद घ्यावी.

07) दरपत्रके सादर करतांना त्यामध्ये संदर्भीय पत्राचा उल्लेख करणे बंधनकारक राहील. सदरील सिलबंद दरपत्रक ही **दिनांकः 10.10.2025** रोजी सायंकाळी 05:30 वाजेपर्यंत या कार्यालयात स्विकारण्यात येतील. त्यानंतर प्राप्त होणारी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाही, यांची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

08) सदरील दरपत्रके पाठवितांना ती **"मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश," जालना** यांचे नांवे पाठविण्यात यावी, तसेच पाकिटावर **"वाहतूकीचे दरपत्रक"** असा उल्लेख करावा.

09) सदरील दरपत्रके ही सिलबंद पाकिटात टाकून पाकिटावर **प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जालना** या पत्त्यावर पाठविण्यांत यावी.

10) सिलबंद दरपत्रके हे जिल्हा न्यायालय "त्रिसदस्यीय वस्तू खरेदी सल्लागार समिती" यांचे समक्ष जिल्हा न्यायाधीश–2, जालना यांचे निजीकक्षात दिनांक 13.10.2025 रोजी उघडण्यात येतील. जर तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास दुस–या दिवशी किंवा नियोजीत वेळेत व ठिकाणी समितीपुढे उघडण्यात येतील.

12) उपरोक्त वाहतुकीबाबत जिल्हा व सत्र न्यायालय, जालना या न्यायालयाने ऑर्डर दिल्यानंतर पाच दिवसांच्या आत सुस्थितीत आणून देण्याची जबाबदारी संबंधीत वाहतूकदार/संस्थेची राहिल, यांची नोंद घ्यावी.

सदरील दरपत्रके स्विकारण्याचा व नाकारण्याचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जालना राखून ठेवत आहे.

आदेशान्वये.

15/9/25

जिल्हा व सत्र न्यायालय
जालना